माझी बोली माझी कथा

संकलक आणि संपादक
डॉ. मोनिका ठक्कर

Scanned with OKEN Scanner

पुस्तक शिर्षक : **माझी बोली – माझी कथा**
Book Title : Mazi Boli - Mazi Katha
(Marathi Dialect Stories and Dialect Research)

संकलक आणि संपादक : **डॉ. मोनिका ठक्कर**
Compiler and Editor : Dr. Monika Thakkar

प्रकाशक : **लोकायन प्रकाशन संस्था**
Lokayan Prakashan Sanstha (An Imprint of C&B Media)

००१, अष्टविनायक बिल्डिंग, ए विंग, तळ मजला,
दत्ताराम लाड मार्ग, चिंचपोकळी (पूर्व), मुंबई–४०००१२
इमेल : lokaayan@gmail.com

प्रकाशक संवाद : **९३७१७६३५१५**

मुखपृष्ठ व मांडणी : **योगेश्वर नामदेव लोळगे**

मुद्रक : **सी ॲण्ड बी मीडिया, मुंबई**

प्रथमावृत्ती : **२७ फेब्रुवारी २०२३ (मराठी भाषा दिन)**

प्रकाशन क्रमांक : ०२

मूल्य : ₹ ११००/–

ISBN : **978-81-960143-1-5**

लोकायन
प्रकाशन संस्था

© सर्व हक्क लेखकांच्या स्वाधीन

Scanned with OKEN Scanner

भगत सिंह कोश्यारी
राज्यपाल, महाराष्ट्र राज्य

सत्यमेव जयते

राज भवन
मलबार हील
मुंबई ४०० ०३५
दूरध्वनी : ०२२-२३६३ २६६०
फॅक्स : ०२२-२३६८ ०५०५

०३ फेब्रुवारी २०२३

शुभेच्छा

प्रत्येक भाषेसोबत ती भाषा बोलणाऱ्या लोकांचे रितीरिवाज, त्यांचे वाक्प्रचार व म्हणी तसेच तत्कालीन सामाजिक व आर्थिक संदर्भ जुळलेले असतात. बोली, उपबोली व पोटबोली संबंधित भाषांची भावंडे असतात व प्रत्येकीत तिचे निहित सौंदर्य सामावले असते.

महाराष्ट्रात मराठी भाषेला समृद्ध करणाऱ्या विविध बोली आहेत. परंतु शालेय शिक्षणात प्रामुख्याने प्रमाणित भाषा शिकविली जात असल्याने आज अनेक बोलीभाषा नामशेष होत असल्याचे दिसते. अलीकडच्या काळात बोलीभाषांना मनोरंजक कार्यक्रमांमधून पुनश्च सन्मान दिला जात आहे ही अतिशय आनंदाची बाब आहे. या संदर्भात बोली भाषांच्या संवर्धनार्थ संकलक व संपादिका डॉ मोनिका ठक्कर यांच्या पुढाकाराने 'माझी बोली माझी कथा' या ग्रंथाचे प्रकाशन होत असल्याचे समजून अतिशय आनंद वाटला.

सदर ग्रंथात एकूण ५७ बोलीतील ५७ कथा असनू प्रत्येक कथा त्या-त्या बोलीतील अभ्यासक लेखकांनी लिहिल्या असून अनेक दिग्गज लेखक मंडळींनी या ग्रंथाला आपले योगदान दिले असल्याचे समजते.

या ग्रंथासाठी पुढाकार घेतल्याबद्दल मी संपादिका डॉ मोनिका ठक्कर यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो व त्यांना तसेच 'लोकायन प्रकाशन' संस्थेला पुस्तकाच्या सफलतेसाठी आपल्या शुभेच्छा देतो.

(भगत सिंह कोश्यारी)
राज्यपाल, महाराष्ट्र

डॉ मोनिका ठक्कर
लोककला आणि लोकसाहित्य अभ्यासक
कांदिवली (प),
मुंबई

Scanned with OKEN Scanner

अनुक्रमणिका

१. **प्रमाण मराठी** । थरार । डॉ. शिरीष भावे /१५
२. **अहिराणी बोली** । सगा आनी भुगा । डॉ. योगिता आशुतोष पाटील /१९
३. **आंधी बोली** । सरोप । डॉ. सखाराम डाखोरे /२७
४. **आगरी बोली** । चोरी । प्रा. शंकर सखाराम /३४
५. **आदिवासी कोकणा बोली** । रामा मामा । डॉ. मधुकर लक्ष्मण भुसारे /४२
६. **आदिवासी पावरी बोली** । इंद्रधनुष्य नी, एकलव्य धनुष्य..!। संतोष पावरा /४७
७. **करपल्लवी** । सांकेतिक भाषा । भरत कदम /५३
८. **कातकरी बोली** । आदिवासी ढोर नाय, माणूस हाय...!। सुभाषचंद्र सोनकांबळे /६१
९. **कादोडी/सामवेदी बोली** । माऊली । सॅबी परेरा /६४
१०. **कुडाळी बोली** । गोठण । वीणा प्रसाद सामंत /६९
११. **कुणबाउ बोली** । डुक । प्रा. महेंद्र खुशालगीर गिरी /८०
१२. **कुरमुडे जोशी (भटकी) बोली** । कोलडंडा । मनोज रामचंद्र भोरे /८६
१३. **कोंकणी बोली** । मनशाचो देव जालो ताजी गोष्ट । रामदास प्रभुगावकर /८९
१४. **कोरकू बोली** । चितरे डो कोलजा । रामगोपाल रामलाल भिलावेकर /९४
१५. **कोल्हापुरी बोली** । झटाझोंब्या । सुचिता घोरपडे /९८
१६. **क्षात्र/खत्री बोली** । आंधळी दया । डॉ. दत्ता वाळवेकर /१०३
१७. **खिवारी बोली** । टाबगीतला भांगार । शिवदासकुमार गणपत मसगे /१०८
१८. **गवळी बोली** । सांजोय । ज्ञानदेव गणपतराव येवले /११०
१९. **गुर्जरी बोली** । अजब प्रेम नी गजब कहानी । रमाकांत फकिरा पाटील /११४
२०. **गोंडी बोली** । मावा कोयतूर रिवाज । रमेश मल्लूजी धुर्वे /११९
२१. **चंदगडी बोली** । तोडणी । बाबू नरसू पाटील /१२६
२२. **चांभारी बोली** । बुडबुडा । डॉ. वाल्मीक अहिरे /१३६
२३. **चित्पावनी बोली** । तांबू गाय । अशोक नेने /१४०
२४. **जालनी बोली** । उदास उरुस । डॉ. प्रभाकर शेळके /१४५
२५. **झाडी बोली** । भुताई ईईर । डॉ. हरिश्चंद्र बोरकर /१५५
२६. **डांगी बोली** । पोशी । भावेश गोंदू बागूल /१७८
२७. **तंजावरी/दक्षिणी मराठी बोली** । श्रीरंगक्षेत्र वैभव । भी. रामचंद्रन /१८३
२८. **तडवी भिल बोली** । उजाड वस्ती । रमजान गुलाब तडवी /१८८

Scanned with OKEN Scanner

कुणबाउ बोली

डुक

प्रा. महेंद्र खुशालगीर गिरी

भल्या पायटं गुलाब बैलखाटे व आवतं बंडीत टाकून व बैलापूरता कडबा घेवून गुलाब आनं सुर्यभान मालकांच्या कान्हाळात वखरासाठी गेला. शुक्राची चांणी निघून गेली. उजडता उजडता दोन्ही माणसं कान्हाळात पोहचले. वखराले जुपणं लावून गुलाबनं तंबाखु हातात घेवून चुना लावला व बैलाले जुंपून वखर हाकलासाठी घेतला आनं सुर्यभानही बैल जुवाले लावून बेड्डी पक्की केली. दोघंही आपआपल्या वखरावर उभाट्यानं वखरु लागले. दोन मुड्डन वखर चालला. तसा धवरा बैलं थबकला पुढं पायतो त का भला मोठा डोम्या नाग फना काढून सुर्यभानच्या वखरासमोर उभा. सुर्यभाननं कासरे आवरले आणि मागं असलेल्या गुलाबले हाक मारली.

'आगा सरप, भला मोठा हाय' गुलाब धावतच आला आणं पायले लागला. सुर्यभानले सकारच्या उजेडात तो कारा कारा नाग चमकत होता दिसत होता. गुलाब्यानं खुरपं आणलं आणि ''कोठं आहे गा'' म्हणून इचारलं. सुर्यभान त्याच्या कडं बोट दाखवलं तसा गुलब्या सरपाले मारले धावला पण थोड्याच वेळात तो थबकला आणि म्हणला ''लई मोठा हाय गा, कारा कारा दिसते म्हजें डोम्याचं होय'' तसाच तो दोन पावलं मागं फिरला.

सुर्यभानची छाती धडधडत होती, कारण कालच त्याच्या काळ्याच्या सुडीवर घरच्या बाजूले कचरा साप करतांना सरपाची लाग दिसली होती. सुर्यभानच्या बायकोनं काड्या काढतांनी सांगीतलं होत का ''येतं काही बायी दिसते त सरप''. गावतल्या सिताराम वाढयाले बरची घेवून बलावलं पोट्टे जमा झाले. सुड उकलली त्यात दोन सरप होते. पोट्ट्याचा गलगला आयकून एक सरप सरसर करत गेला मातर दुसरा तसास फना काढून सिताराम आणं सुर्यभान कडं पायतं होता. सुर्यभान नं सितारामच्या हातातील बरची घेतली पण सिताराम वाढयानं एका झटक्यात त्याच्या हातून हिसकून घेतली व म्हणला ''आबे मारु नको लागीचा सरप हाय थो डूक धरते बरं''

Scanned with OKEN Scanner

पोट्टेसोट्टे गलका कराले लागले तसा सरप जावाले लागला. सुर्यभान जवळ काळी होती त्यानं मागचा पुढचा काही इचार केला नाही आणं सरपाच्या मुंडक्यावर काळी मारली. तसा तो डोम्या सरप उचावला आणं फणी कडून सुर्यभान वर डोकं आपटाले लागला. तशी सुर्यभानची बायको पुढे आली आणि सुर्यभानले बाजूले केले. पण सुर्यभानच्या डोऱ्यात भलतीच आग होती. त्यानं मागचा पुढचा इचार न करता पुन्हा काळीचा तडाखा डोम्या नागाच्या डोक्शावर मारला सरप निपचित झाला पण दुसऱ्या सरपानं मात्र पायलं होत तसा तो गायप होता.

मारलेलं सरपाचं धुडं घेवून सुर्यभान पांदीवर आला तसा पुन्हा एक सरप त्याच्या पुढं काराकारा लाल लाल डोऱ्याचा सुर्यभान कडं पायले लागला. सुर्यभान घाबरा घुबरा झाला घामानं त्याचे कपडे वल्ले झाले. तसा मारलेल्या सरपाले टाकून पटापट पावलं टाकत सुर्यभान घराकडं आला. घरी आल्या आल्या त्यानं टाक्यातलं पाणी टमरेलंनं घेतलं आणं पायावर वतलं पाय धुतले, तोंडावर सपसप दोन आंजोरी पाणी मारलं आणं घरात आला. घाम पुसला पण त्याच्या समोरुन पांदीवर दिसलेल्या सरपाचं भूत काही केल्या जात नव्हतं, सुर्यभान भयानं थरथरत होता. तेवढ्यात सुर्यभानाची बायको त्याले इचाराले लागली.

''काउन जी घाबरे घुबरे झाले तुमी''

''सुर्यभान म्हणाला काही नाही वं असचं, थोडं थकल्या सारखं वाटते.''

''बापा घाबरले का तुमी त्या सरपाले'' बायको म्हणाली.

''नाही वं त्याले कायले घाबराचं थो मेला सरप काही पाठीमागं येते का?''

बायकोनं क्षणभर त्याच्याकडे पायलं आनं म्हणाले लागले,

''काई मना तुमी लागीचा सरप मारला तवा पासून तुमाले काहीतर व्हतं''

सुर्यभान चिडीच्या आवेशात बोलला –

''जा न वं तुले का करा लागते, कायले महा डोक्स खाते, काही नाही झालं मले''

सुर्यभानची बायको सयपाक घरात गेली, चुलीवर चहा ठेवला आण इस्तो सरकावला काड्या नाही म्हणून पुन्हा बाहेर आली, आणं कुपाच्या बाजुले सुडीवर काड्या काढाले लागली तं भला मोठा नाग फना काढून तीच्या कडं पायत होता. सुर्यभानची बायको भेदारली, आणं धावतं आतमधी आली सुर्यभानले सांगले लागली.

''आ जी भला मोठा सरप सुळीत हाये''

तसा सुर्यभान मनातून घाबरला सरप टाकाले गेलो तेतं सरपं दिसला आणं पुन्हा सुळीत बायकोले सरप दिसला. कायची पंचाइत झाली मायले; म्हणून तो बाहीर आला पायते तो काई दिसलं नाही बायकोले मनाला.

''काई तं दिसत नाही व तुले भास झाला असलं''

बायको म्हणे ''नाही जी मी मह्या डोऱ्यानं पायलं सरपच होता''

''काहीच्या काही सांगते वं, सरप त मगाच मारला''

सुर्यभान बोलला. तसाच पुन्हा बाहीर आला तं सुडीवर कारा पाईप कोणतरी ठेवला होता त्याचा तुकडा दिसला तसा तो हासला आणं म्हणे, ''बह्याडे यो पाईप हाये सरप नोये''

थोड्या वेळात सावरासावर झाली सुर्यभानचं पोरगं रमष्या खेलून आलं आणं आंग धुण्याच्या गोट्यावर पायं धुवाले लागलं तसं पोट्ट बोबंलं 'माय व सरप, सरप हाय येतं' पोट्ट धावत घरामंधी आलं मायले बिलगलं तशी सुर्यभानची बायको बाहिर आली तं काहीचं नाही, पोट्ट्याच्या पाठीवर रट्टा मारुन त्याले सांगीतलं.

''काही बोलते कारे कोठाय सरप काही नाही'' पोट्ट घाबरलं होतं.

Scanned with OKEN Scanner

दिवस वर आला सुर्यभान मालकाच्या घरी गेला व मालकाच्या खारीतून गवताचं वजं घेवून बंड्यावर आला, आणं परसाकडं जातो म्हणून थो टमरेल घेवून आखरावर गेला. आखराच्या झुडपात परसाकडे बसला तसाच त्याच्या समोर कारा कारा डोम्या नाग सरकनं गेला. तसाच उठला पायजमा बांधला आणं त्यानं मालकाच्या घराकडे धुम ठोकली. मालकाले, गुलाबले त्यानं सांगतले–

''लई वेळा मले सरप दिसला, दरोज मले सरपच दिसते'',

मालक म्हणे ''आबे तुले भास झाला असनं''

तसा गुलाब्यानं दुजोरा देल्ला

''काल कानारात वखरतांनी सुर्यभान च्या वखरा समोर सरप होता जी''

मालकानं समजावलं,

''तसं काही नसते बे, जनावर आये आलं असनं समोर''

सुर्यभानच्या मनात धास्ती सुरु झाली. काल आपून लागीचा सरप मारला तेचाच काहीतर परिणाम होय, असं मले वाटाले लागलं तसाचं त्यो बाजीराव मडाव्याकडे गेला, सांगाले लागला का दोन तीन येरा सरप दिसला. त्यानं पायलं का. सुर्यभान घाबरला होता, त्याले इचारलं–

''तुन सरप थ्या दिसी मारलं थो लागीचा होता नं'' सुर्यभान नं मान डोलावली, तसा बाजीराव बोल्ला,

''आरे लागीचा सरप मारु नये थो तरास देत नाही. निघून जाते जनावर, तुन लेका मारलं सरपाले'', तसा सुर्यभान आणखीनं चेपला आणं विचारलं ''आता का करा लागते गा'' बाजीराव फुकफाक, मंत्र तंत्र जाणणारा होता, त्यानं गिलासात पाणी घेतलं, त्यावर मंतर मारला आणं त्याले ते पाणी पाजलं. आणं आपल्या थैल्यातून एक लाल दोरा काढून हातात घेवून त्याच्यावर मंतर मारला असे तीन दोरे सुर्यभानच्या हातात देल्ले.

सुर्यभान घरी आला, बायकोले एक दोरा देल्ला, रमष्याले एक दोरा बांधला व सोताही दोरा बांधला. जेवन करुन सुर्यभान मालकाच्या वावरात गेला. आज हुडकीतलं वखरनं होत गुलाब व सुर्यभाननं आवतं बंडीवर टाकले, बैल जुतले आणं हुडकीत आले. वखर जुतला आणं मुडुन घेतलं उभाट्यानं वखराले लागला. गुलाब पुढं गेला सुर्यभान मागं होता. वखराच्या पासा मधी कचरा अडकला म्हूणं त्यानं वखर कलता केला व खुरप्यानं कचरा साफ करु लागला, तस्सा खुरप्याचं टोकाले काहीतरी लागलं म्हणून त्यान पायलं तर भला मोठा डोम्या कारा नाग फणी काढून त्याच्या समोर उभा त्यानं बैलाचे कासरे सोडले आणं धावाले लागला. सरप त्याच्या पाठी मागं, गुलाबाले दिसलं का सुर्यभान काहून धावत आये तसाच त्यानं आवाज देल्ला. ''कावून धावते गा!'' सुर्यभान गावाच्या रस्त्याकडं धावत जात होता. पण मागं भलमोठं कारं धुड होत सरपाचं. नामदेव खात्याच्या मोवापाशी सुर्यभान ठेच लागून पडला तसा डोम्या नागानं त्याले फना मारला. आनं सरप झुडपात गायब झाला. गुलाब मागून धावतच आला पायतो तो सुर्यभानच्या तोंडातून फेस येत होता. तसाच त्यानं बंडी आणली बाजुले पडलेला लहान गोटा सुर्यभानच्या हातात देल्ला, आणं मारोतीच्या देवळासमोर आणलं. मालकानं गावतल्या सरप उतरवणाऱ्या नागो बुढ्याले, सिताराम वाढ्याले बलावलं. गावात गलका झाला सुर्यभानले 'पाणं' लागलं.

सुर्यभानले मारोतीच्या देवळा समोर बसवलं, मालकानं म्हटलं ''आरे त्याले चंद्रपूरले दवाखान्यात घेवून जावा लागते.'' तरी नागो बुढयानं खुर्चीवर बसवलं, कोणीतरी कडूनिंबाचा पाला आणला नागो बुढ्यानं तांब्याच्या गडव्यात पाणी आणलं आणं मारोतीच्या डोकशावर टाकलं, काही तरी मंतर म्हटले आणं उपचार सुरु झाले. निंबाचा पाला सुर्यभानले खाले लावला सुर्यभाननं खाल्ला, तरी सुर्यभानले झेंडू येत होते. लई येळ

Scanned with OKEN Scanner

झाला तरी झेंडू कमी होत नव्हते, कोणी म्हणे 'चंद्रपुरले घेवून जावा दवाखान्यात', पायावर सरपाच्या चावाचे खुणा होत्या. नागो आणं सीताराम नं थ्या पायल्या आणं तेथं चिंदी बांधली. दुपार झाली तरी सुर्यभानचं ईष उतरत नव्हत, चंद्रपूरले दवाईखान्यात नेण्याची तयारी झाली पण, झेंडू दाटून येत होते. चार वाजले आणं सुर्यभाननं मान टाकली. गलका झाला. नागोले अपयश आलं तसचं सुर्यभानले घरी आणलं. सोपस्कार झाले. सुर्यभानले लामणीवर आणलं चिता रचली. रमष्यानं अग्नी देल्ला बाजूच्या झुडपात कारा डोम्या फना उंचावत त्याच्या सरणाकडे पायतं होता. गावातल्या लोकाच्या चर्चा होत होत्या 'का लागीचा सरप मारला, त्याच्या जोडीतल्या सरपानं डुक धरलं आणं सरप मारणाऱ्या सुर्यभानले थ्यो चावला, लागीचा सरप मारु नये बाप्पा लई घातक असते'. सुर्यभानची बायको आता सरप दिसला का, कडा कडा बोटं मोडते शिव्या देते. पागला सारखी वागते. सरप दिसला का त्याच्या मागं धावते, आनं हासते मारलं बुहाऱ्यानं मह्या नवऱ्याले म्हणून रडाले लागते.

कथासार (प्रमाण मराठी भाषेत)

प्रस्तुत 'डूक' ही कथा ग्रामीण परिसरातील असून, मिलनोत्सुक दोन साप त्यापैकी एक मारला तर दुसरा साप मारणाऱ्या माणसाचा पाठलाग करतो. त्याचा बदला घेतो अशी अंधश्रद्धा आहे. (नागपूर, चंद्रपूर, वणी या भागात 'पाणं लागणे' 'काडी लागणे' असा शब्द प्रयोग सर्पदंश झाला तेव्हा केला जातो. अंधश्रद्धा अशी आहे की, 'सरप चावला' असे म्हटल्यास सापाचे विष उतरत नाही म्हणून हा शब्द प्रयोग.

प्रस्तुत कथा एका गावातील असून, सुर्यभान हा एक कुणबी शेतकरी माणसाकडे नोकर आहे. सालदार म्हणजे त्याच्या सोबतचा गुलाब हा त्या कुणबी शेतकऱ्याचा दिवाणजी आहे. पण दोघेही सारखेच कामे करणारे. सुर्यभान आणि त्याचं कुटुंब लहान आहे. झोपडीवजा त्याचं घर आहे. बायको व एक मुलगा असे छोटे कुटुंब सुखी कुटुंब. बायको मोलमजुरी करणारी. स्वयंपाकाला लागणारे सरपण घराच्या बाहेर रचुन ठेवलेले असे चित्र. तेथूनच कथेला सुरुवात होते. त्याच ठिकाणी साप मारलेला असतो.

या परिसरातील शेतमजूर सालकारी पहाटे शुक्राची चांदणी निघाली की कामाला जातात. त्याच प्रमाणे या कथेतील दोघेही शेतमजूर मालकाच्या शेतावर कन्हाळ व हुडकी (ही शेताची नावे आहे) येथे वखरण म्हणजे उन्हाळवाडी करायला जातात. त्याच वेळेस वखर जुतून कामाला सुरुवात होते व घटनाक्रम पुढे पुढे सरकतो व साप दिसतो हा साप प्रामुख्याने नाग या जातीचा डोम्या असे या भागात संबोधले जाते. हा या भागातील विषारी नाग. तो सुर्यभानच्या मागे लागतो कारण त्याच्या प्रेमिकेला दुसऱ्या सापाला सुर्यभानने मारलेले असते, त्यामुळे तो सुर्यभानचा राग धरतो आणि मागे लागतो. लोकरुढी प्रमाणे लागीचा किंवा मिलनोत्सुक साप मारु नये असा संकेत आहे. त्याला प्रणयक्रिडा करु द्याव्या प्रणयक्रिडेत रममाण झालेले साप आपल्या धुंदीत असतात ते कुणालाही त्रास देत नाही. परंतु ग्रामीण भागात साप म्हणजे शत्रु, विषारी जनावर अशी अंधश्रद्धा. त्यामुळे सापाचा बळी जातो. दुसरा साप पाहतो व तो त्या मारणाऱ्या माणसाचा चेहरा लक्षता ठेवतो व घटनाक्रम घडत जातो अशी मानसिकता.

शेवटी कथेच्या उत्तरार्धात सुर्यभानला साप एकांतात पाहतो व वखराच्या फासात अडकलेला कचरा काढताना तो फणा उभारतो आणि त्याला घाबरवतो तो पळतो त्याच्या पाठीमागे लागतो व दंश करतो. सोबतचा गुलाब ज्या ठिकाणी सापाने दंश केला त्या ठिकाणचा एक दगड सुर्यभानच्या हातात देतो. अंधश्रद्धा अशी आहे की, ज्या ठिकाणी साप चावला त्या परिसरातील कोणतीही वस्तु हातात घेवून यावी असा तो निर्देश आहे. गावातील मांत्रिक वेगवेगळ्या जातीतील आहे. ते सुर्यभानला वाचविण्याचा प्रयत्न करतात पण सापाचे

Scanned with OKEN Scanner

विष भयंकर भिनले आहे. त्यामुळे ते उतरत नाही, प्रयत्नांती सुर्यभानचा मृत्यू होतो, त्यानंतर त्याची बायको वेडी होते. ती बडबडते. गावातील लोकात चर्चा असते ''लागीचा सरप मारु नये बाप्पा थ्यो डूक धरते'' सुर्यभानचं कसं झालं, या कथेचा शेवट शोकात्म होतो. परिसरातील प्रादेशिक श्रद्धा अंधश्रद्धा याचा मागोवा घेतला आहे. या कथेमध्ये कुठलीही अंधश्रद्धा नाही केवळ घाबरल्यामुळे धक्क्याने सुर्यभानचा मृत्यू होतो. सापाबद्दल अनेक गैरसमज असतात त्यापैकी हा एक गैरसमज.

कथेतील कठीण शब्दांचा अर्थ

आवतं – वखर/नांगर वगैरे, जु – बैलाच्या मानेवर ठेवयाचे लाकडी जु, बेकृी – जुवापासून बैल सुटू नये म्हणून मानेवर पक्के बांधण्यासाठी केलेली चामडे आणि दोरीची योजना, उभाथ्यान – वखरावर उभे राहून, मुकून – दोन ओळीतील अंतर, सकार – सकाळ, सुड – सरपण रचुन ठेवलेले, लाग – दोन सापाचे मिलन, बरची – साप मारण्याची काठी/समोर लोखंडी चाकू सारखा भाग लावलेला, कुप – कुंपन, पाणं लागणं – सापाने दंश करणे, झेंडू – आकडी येणे/झटके येणे, चिंदी – कापडाचा तुकडा, आंजोरी – आंजोळ, वजं – ओझे, मोव – मोहवृक्ष, पांदण – गावा बाहेरील रस्ता, आखर – गुरे एकत्रित करण्याची जागा, खारी – गावाजवळील शेत, बंडा – गुरेढोरे बांधण्याची जागा.

कुणबाउ बोलीचा परिचय

प्रस्तुत 'डूक' ही कथा मराठीतील चंद्रपूर, नागपूर भागातील कुणबाउ बोलीतील कथा आहे. सदर कथाभाग प्रादेशिक भागाच्या अनुषंगाने वणी–चंद्रपूर या भागातील असून या भागात वऱ्हाडी आणि नागपूरी कुणबाउ बोलीचा प्रभाव दिसून येतो. ग्रामीण भागात शेती करणारा कुणबी समाज या भागात बहुतांश आहे.

विदर्भ हा महाराष्ट्र राज्याचा प्रशासकीय भाग असून त्यात अमरावती व नागपूर या विभागाचा समावेश होतो. विदर्भाच्या दक्षिणेस पैनगंगा व प्राणहिता या नद्यांची मर्यादा असून उत्तरेला सातपुडा पर्वतरांगा, पूर्वेला वैनगंगा नदी, वर्धा, पूर्णा, कन्हान, पैनगंगा, वैनगंगा, वेणा, चंद्रभागा, बंदिय, पर्लकोटा या नद्या आहेत.

विदर्भातील समाजजीवनात, जातीजमातीत विविधता आढळते. शेती करुन त्यावर उदरनिर्वाह करणाऱ्या जाती मोठ्या प्रमाणात असुन, विदर्भात कापूस, ज्वारी, तांदूळ याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. अल्पभूधारक स्वतःच्या शेतीप्रमाणे शेतमजूरी किंवा ठेका पद्धतीने किंवा बटाईने शेती करतात. चंद्रपूर–गडचिरोली भागात धानशेती करणारे कुणबी असून त्यात धनोजे कुणबी जास्त आहे. त्या सोबतच खैरे कुणबी, झाडे कुणबीही आहे. कुणबी बहुतांश आहेत. याशिवाय वाढई, खाती लोहार, सोनार, कोष्टी, न्हावी, कुंभार, कसार, वाणी या सर्व जातीचे लोक आपआपले परंपरागत व्यवसाय किंवा शेती करतात. विदर्भात विविध जमातीमध्ये गोंड, परधान, कोलाम या जमाती आहेत.

विविध जाती जमातीचे लोक विदर्भात एकत्रित राहतात त्यांनी आपल्या परंपरा व लोकसंस्कृती बऱ्याच प्रमाणात जपलेली असून काही प्रमाणात त्यांची देवाणघेवाण झालेली आढळते. ग्रामीण भागातील समाजजीवन अजून परंपरागत रुढी, प्रथा, परंपरा जपत आलेले आहे.

वैदर्भीय बोलीभाषेत प्रामुख्याने वऱ्हाडी बोली, नागपूरी बोली, चंद्रपूरी बोली याचा उल्लेख करावा लागतो. एकाच मराठी मायबोलीची विविध रुपे यात दिसतात. भंडारा जिल्ह्यात थोडा वेगळा प्रकार

Scanned with OKEN Scanner

आढळतो. विदर्भाच्या प्रमुख आदिवासी बोलीमध्ये गोंडी बोली, कोलामी आणि बंजारा या तीन प्रमुख आदिवासी बोली आढळतात. मुख्य म्हणजे या ग्रामीण भागातील बोलीत मौखिक परंपरेने चालत आलेले भरपूर लोकसाहित्य आहे. नागपुरी व चंद्रपुरी कुणबाउ बोलीतील मौखिक परंपरेचे लोकसाहित्य त्यात आढळते.

प्रस्तुत कथेतील आलेली पात्रे विविध जाती जमाती मधील आहे. ग्रामीण भागातील एखादी घटना कथारुप कसे घेते हे कथेत दिसून येते. या कथेतील प्रत्येक पात्र ऐकमेकांशी जोडलेली आहेत व बोलीचा प्रभाव घेऊन ती वाचकाशी संवाद साधते.

लेखकाचा थोडक्यात परीचय

प्रा. महेंद्र खुशालगीर गिरी हे श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती येथे मराठी विभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांना १७ वर्ष अध्यापनाचा अनुभव असून लोककला आणि लोकसाहित्याच्या विविध पैलूंवर त्यांना संशोधनाचा अनुभव आहे. त्यांचे संशोधनाचे कार्य आविरत सुरूच आहे. या संशोधन कार्यात प्रामुख्याने 'महाराष्ट्रातील दशनाम गोसावी भटका समाज : शोध आणि बोध' (साहित्य, संस्कृती, बोली, भाषा, इतिहास या संदर्भातून संशोधन सुरु आहे) मराठी लोक साहित्याचा अभ्यास ग्रामीण भागातील विरगळ व त्या संदर्भातील आख्यायिका यांचे संशोधन. विविध विषयावर संशोधन निबंध. २० विषयावर संशोधन पत्रिकांमधून प्रसिद्ध. मेळघाटातील कोरकूच्या लोकवाद्यावर संशोधन व लोकसंस्कृती, लोकदैवताचा अभ्यास पुढील संशोधन प्रकल्प डॉ. मधुकर वाकोडे, डॉ. काशीनाथ बऱ्हाटे डॉ. एकनाथ तट्ठे यांच्या मार्गदर्शनात करीत आहेत.

भ्रमणध्वनी : ९४२१७३६६६२, ८३२९८८२६२७

ईमेल : mkgiri7867@gmail.com

Scanned with OKEN Scanner

बोल बोबडे बाळाचे, असते प्रिय जसे आईला
माय मराठी ही गाते कोडकौतुके, लाडविते 'बोली'ला
बोली बोलली नानापरी ही, जशी उमगली माणसाला
माय मराठीने श्रृंगार केला, साज सजविला सभ्यतेला
संस्काराची संस्कृती लाभली, यामुळे आपल्या मातीला...

बोल बोबडे बाळाचे, असते प्रिय जसे आईला
मान मिळविला भाषेला, नमन माय मराठी आईला
सुंदर काया, गोड वाणी, थेटपणा या भाषेला
बोल बोबडे बाळाचे, असते प्रिय जसे आईला
वंदन करुया, माय मराठीच्या या 'बोली'ला.

-डॉ. मोनिका ठक्कर



ISBN 978-81-960143-1-5
9 788196 014315
लोकायन
प्रकाशन संस्था

Scanned with OKEN Scanner